# प्रकरण पाचवे

# 'बारोमास'मधील भाषाशैली

- प्रस्तावना
- 'बारोमास'मधील भाषाशैलीचे घटक

    १. मनाचा वेध घेणारी भाषाशैली

    २. भाषाशैलीतील प्रवाहिपणा

    ३. संवाद निर्मिती

    ४. काव्यात्मकता

    ५. उपमांचा समर्पक वापर

    ६. वाक्यप्रचार, म्हणी यांचा वस्तुनिष्ठ उपयोग

    ७. अस्सल ग्रामीण शिव्यांचा समावेश

    ८. सदानंद देशमुख यांच्या लेखनाचे वेगळेपण

- समारोप
- संदर्भग्रंथ

प्रकरण पाचवे

# 'बारोमास' मधील भाषाशैली

## प्रस्तावना

ग्रामीण कादंबरीत 'भाषा' हा घटक अतिशय महत्त्वाचा असतो. भाषेला मिळालेले विशिष्ट असे वळण म्हणजेच भाषाशैली. लेखक ज्या परिसरातील असतो त्याच परिसरातील भाषा त्याच्या लेखनामध्ये अवतरत असते म्हणून सदानंद देशमुख यांनी आपल्या 'बारोमास' या कादंबरीत ''निवेदनासाठी प्रमाणबोली व पात्रांच्या संवादासाठी वऱ्हाडीबोली असे भाषाउपयोजन वास्तवाभिमुख जीवनदृष्टीतून झाले आहे. पात्रानुरूप बोलीचा पोत निर्माण केल्याने पात्रस्वभावाचा वेगळेपणाही लक्षात येतो. वऱ्हाडी लोकभाषेतील म्हणी व वाक्यप्रयोगांचा वापर निवेदनात नैसर्गिकता निर्माण करतो. निवेदकाच्या वास्तवलक्ष्यित्वाचा प्रत्यय बोलीच्या उपयोजनामागे आहे''[१] अशा प्रकारची देशमुख यांची लेखनाची खास अशी एक वेगळी भाषाशैली आहे. आणि त्या माध्यमातून ते आपल्या भावना व विचार कलाकृतीत साकार करतात. यावरून आपल्या लक्षात असे येते की विदर्भातील ग्रामीण कादंबरीकारांनी आपल्या पारंपरिक शैलीचेच अनुकरण करत समस्याप्रधान कादंबऱ्या निर्माण केल्या आहेत. तरी आपण 'बारोमास' या कादंबरीतून निर्माण झालेले विविध भाषाशैलीचे घटक अभ्यासू.

## 'बारोमास' मधील भाषाशैलीचे घटक

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मराठी साहित्यात ग्रामीण कादंबरीस महत्त्व मिळू लागले. विदर्भ, खानदेश, मराठवाडा, प. महाराष्ट्र, कोकण, मुंबईचा परिसर यांचे भावनिक नातेसंबंध निर्माण होत

होत ग्रामीण अस्मिता जोपासली गेली. आणि त्यातूनच ग्रामीण कादंबरी वाढत गेली. ग्रामीण भागातील निसर्ग, भूभाग, माणसे, माणसाच्या चाली, परंपरा, त्याची बोलीभाषा या घटकावर ग्रामीण कादंबरी निर्माण होऊ लागली. म्हणूनच सदानंद देशमुखांनी विदर्भातील मोहाडी,सांजोळ, खामगाव या गावांचा परिसर आपल्या कादंबरीत जिवंत स्वरूपाने उभा करताना भाषाशैलीचा महत्त्वपूर्ण उपयोग करून घेतला आहे.

'बारोमास' ही ग्रामीण कादंबरी लिहित असताना, देशमुखांनी वाचकांच्या अंतर्मनाचा वेध घेणारी भाषाशैली उपयोजिली आहे. कादंबरीत चटकदार संवाद आहेत. शिवाय अनुरूप शब्दांद्वारे अनुकूल अशी वातावरण निर्मिती केली आहे. कादंबरीतील व्यक्तिरेखांची ओळख व घटनांचे निवेदन रेखीव व समर्पक शब्दांनी केले आहे. त्यामुळे कलाकृतीतील एकनाथ, अलका, नानू आजा, सुभानराव, शेवंतामाय, मधु, सुरेश साठे, बनुबा व ममता वारे यासारख्या व्यक्तिरेखा व काही घटना प्रसंग वाचकांच्या डोळ्यांसमोर चटकन उभे राहतात. त्यामुळे कादंबरीतील भाषाशैलीचा प्रवाहीपणा लक्षात येतो.

कादंबरी हा वाङ्मयप्रकार म्हणजे एक सामाजिक दस्तऐवज आहे. या वाङ्मयप्रकाराची निर्मिती भाषेच्या माध्यमातून होत असते. म्हणूनच कादंबरीतील संवादनिर्मिती भाषेद्वारे होत असताना दिसते. याच भाषेच्या माध्यमातून लेखकाने कलाकृतीत काव्यात्मकता निर्माण केली आहे. आणि घटना प्रसंगाचे औचित्य साधून उपमा, म्हणी, वाक्यप्रचार,प्रसंगी शिव्यांचाही महत्त्वपूर्ण उपयोग करून घेतला आहे. म्हणूनच देशमुख यांच्या लेखनाचे वेगळेपण जाणवते. ते आपण घटकांच्या आधारे अभ्यासू.

## १. मनाचा वेध घेणारी भाषाशैली

सदानंद देशमुख यांची 'बारोमास' कादंबरी वाचत असताना त्यांची भाषाशैली महत्त्वाची वाटते. कोणत्याही विषयाचे कथानक हे प्रभावी होण्यासाठी, प्रथम ते कोणत्या भाषेतून लिहिलेले आहे. हे महत्त्वाचे असते. म्हणून आज भाषाशैलीला महत्त्व मिळत आहे. काही लेखक प्रमाण भाषेत लेखन करताना दिसतात. तर काही लेखक ग्रामीण भाषेत लेखन करताना दिसतात. या दोन्ही भाषेतील साहित्याची तुलना केली, तर ग्रामीण भाषेतील साहित्य हे प्रभावी दिसते. म्हणून आपण ग्रामीण भाषेतील साहित्य वाचायला लागतो तेव्हा आपण लगेच त्या साहित्याशी एकरूप होतो. आपणाला ते साहित्य जवळचे वाटते. त्या साहित्यातील काही व्यक्तिरेखा, घटना-प्रसंग आपण आपल्या परिचयाच्या परिसरात शोधायला लागतो तेव्हा बऱ्याचवेळा ते सापडतातही. म्हणून आपणाला ग्रामीण साहित्य व त्यातील भाषा जवळची व महत्त्वपूर्ण वाटते. तरी लेखकाने कादंबरीत लिहिलेल्या भाषाशैलीचे काही नमुने आपण पाहू.

''चुलीतला आहार आपल्या काळजावर झोंबल्याची जाणीव अलकाला झाली. धगधग डोळ्यांनी ती सासूकडे पहायला लागली.''[२]

''अरे जुन्या गुप्तधनावर राखण ठेवेल राखणे म्हन्जे भूतचं अस्तात कोकरा. भुजंग, हेले, डुकरं, ऋषी, हजारो सालापासून जिते हायेत ते. घबाड ठेवताना टोणगं करून मांत्रिक लोकं कणकीच्या गोळ्यापासून करेल ह्या राखण्यात जीव भरून ठेवत व्हते. त्याच्यानं घबाड ठेवणारे राजे-महाराजे मेले. पण हे राखणे जित्तेच हायेत आजून. कावून की त्याह्यची पैदास आपल्या सारख्या मायबापाच्या, नरमादीच्या संबंधातून थोडीच काई व्हत आस्ती...''[३]

''काहो बनुबा, कितीक खंदायचं महाराज आजून? 'इथं काही अंदाज दिसत नाई कशाचा...' तेजस गवई घाम पुसत म्हणाला.

'आरे हिंमत धर! हिंमत सोडून कसं चालंल? पांढरी माती हाये नं? अन् पांढरी माती म्हन्जे जुन्या वस्तीचं लक्षण. चालू द्या. देवानं दृष्टांत देल हाये.'

'किती वाजले आसतील आता?' दिलीप पवारने विचारलं.

'किती वाजले इचारायले ही का शाळा हाये का मास्तरा तुमची? टोल पल्डा की चालले मुतायले. टाइमपास करायले. इथं वाजलेचा काई मेळ नस्ते... फक्त चालू राह्याचं.''[४]

''आरे त्या मधुले बलवं रे एकनाथा... काय झालं ते इचारून तरी घेता येईल. त्याले डाक्तरले दाखोलं तरी गुण नाई. सहदेव गुरवाचं पाणी देलं. तरी गुण नाई. तारू भटजीचा परसाद देला. तरी गुण नाई..ऽऽ सगुण पाह्यला तरी गुण नाईऽऽ आता करू तरी काय? झालंच काय माह्या लेकाले? रांडमुंडचं लेकरू हाय रे देवा... त्याच्या नशिबात काय भवाडे आणले व माय! ह्या वाईट संगतगुणापायी माहं लेकरू भायाभिन झालं रे देवाऽऽ''[५]

''कोणीतरी ढकलून द्यावं तसा बळीमामा बाहेर आला. तेव्हा बाहेरच्या उन्हाची धग त्याला जाणवली. तो रस्त्याला लागला तेव्हा घामाच्या धारा सुटू लागल्या. डोळ्यापुढे सगळ्यात खाली दाबलेला गठ्ठ्यातला आपला अर्ज आठवला आणि त्याने सुस्कारा टाकला. आता बँकेकडून कधी पैसे भेटावं, कधी पाच टक्क्याचे फेडावं, अन् कधी बियाभरणाचा मेळ लावावं. या विचाराच्या पहाडाखाली त्याला दडपल्यासारखं वाटू लागलं आणि तो भयाण झाला. हे त नुस्ते टपाले धंदे हायेत. बँकीचे काढा अन् बँकीसाठी काढलेल्या पाच टक्क्याचे भरा. ते किती व्हतील? साडेपाच हजार. पाचशे निलचे दाखले आणायच्या हेलपाट्यात गेले. शे-दोनशे आसे तसे खर्च झाले. आता लोन भेटलं पाच हजार. मन्जे हजार रुपयाचं त या टपाले धंद्यातच चरपट बसलं. पण पेरणी कशी करावी? पेरणीसाठी पुन्ना पाच टक्के हायेच. हंगामाच्या घाती त्याच्या पैशाची व्हती दिढी. इकटिक करून हातात पाच रुपयेबी राहात नाई. आपल्या नशिबातले हे येणे आजूक किती दिवस चालणार ?

'बारोमास' राबूनबी आपली कडकी अन् छातीतली धडकी दूर व्हत नाई. कंधीच सुखाचा घास भेटत नाई, त आपून जगतो तरी कशासाठी? चालताना त्याचे पायात पाय अडकू लागले.''[६]

''आरे हे कीटकनाशकं राह्यलेच नाई पह्यल्यासारखे पावरफुल आता. नवीन नवीन त नुस्त्या वासानं किडे-आळ्या मरत. आपल्या जगदेव तनपुरेचा बाब्या, दिवसभर फवारणी केली वावरात. तोंडावर रुमाल बांधला नवता का जेवायच्या वक्ती हात धुतले नवते साबनानं कान्नू? पण रात्चा जहेर भिनून त्यो झोपीतच मेला. अन् आता त दोन-चार झाकणं घेऊन बी मरत नाई माणूस. डबाभर प्यावं का काय कान्नू?''[७]

वरील पद्धतीची भाषाशैली संपूर्ण कादंबरीत उपयोजिली आहे. त्यामुळे ही भाषाशैली वाचकांच्या मनाचा वेध घेते.

## २. भाषाशैलीतील प्रवाहीपणा

या कादंबरीच्या भाषाशैलीत एक प्रकारचा प्रवाहीपणा जाणवतो लेखक अनेक घटना-प्रसंगाचे चित्रण करताना तो प्रसंग वाचकांच्या डोळ्यांसमोर उभा करण्यात यशस्वी झाला आहे. शब्दांची समर्पक मांडणी करण्यात तो कोठेच कमी पडला नाही. त्यामुळे कादंबरीत एक प्रकारचा प्रवाहीपणा जाणवतो. ते आपण पाहू.

''तो ममता वारेच्या घरी आला. चकचक सिमेंटचं घर. नवरा ग्रामसेवक. बायको प्रायमरी शाळेत मास्तरीण. पैशाची कमी नाही. बंगलाच उभारला. गल्लीत हेच एक पॉश घर. बाकी सगळे जुनाट. माळोदाचे. भिंतीला तडा गेलेले. दत्ता वारेने तिकडं बस स्टँडवर प्लॉट घेऊन बंगला बांधायचा. तर इथं बांधला. आपल्याला झुरवण्यासाठी.''[८]

''विद्यावान अतिमैचातूर ऽऽ ना हूं ऐसा थातूर मातूर... खोदत है हम सुरसूरांबा... दूर का वैरी दूर ही लंबा... पिला सोना छू मंतर... नदी का पाणी छू मंतर... गुरूकी विद्या छू मंतर... मेरी भक्ती छूं मंतर... छूं मंतर... छूं मंतर...ऽऽ''[९]

''मग रेडिओवर बातम्या क्रमश: संस्कृत, हिंदी, मराठी... आतल्या घरात इकडे-तिकडे बायकांचा वावर स्पष्ट जाणवतोय. सासूचा कर्कश आवाज. जयाचा उजळ. तेजस्विनीचा त्याहून उजळ. अलकाचा दबका. जयाचा आवाज एकदम दारातच.''[१०]

''तू माझ्याशी शब्दही बोलू नको म्हातारे. मला सूनबाई म्हणू नको. मी तुझी सून नाही. आणि तू माझी सासू नाही. विसरून जा म्हणते असं म्हणायला लाज नाही वाटत? तू असशील सरड्यासारखे रंग बदलणारी. पण मी स्वाभिमानी आहे. माझे निर्णय ठाम आहेत. माझा तुम्ही अतोनात छळ केला. तुम्ही कोणीच सुखी होणार नाही. त्या कुत्र्याचे तर जन्मभर हाल होतील. त्याचा नायनाट, सर्वनाश होईल. हा माझा शाप आहे.''[११]

''आपल्या देशाच्या दहाव्या शतकानंतरचा मारझोडीचा इतिहास तेवढा जास्त प्रमाणात आपल्यापुढे उजळ स्वरूपात आहे. त्याही पूर्वीचा म्हणजे रामायण-महाभारताचा पौराणिक कालखंड जनमानसात रूढ आहे. तोही मारझोडीचाच. पण या दोन्ही काळांपेक्षा मधल्या काळातला आपल्या संपन्न देशाचा सांस्कृतिक कलाकुसरीचा इतिहास खूप वैभवसंपन्न व लालित्यपूर्ण आहे. पण तो पाहिजे तेवढ्या प्रमाणात लोकांपुढे उजळ झालेला नाही. त्या काळाचे संदर्भ आहेत ते किती चांगले वाटतात. म्हणजे चारूदत्त, वसंतसेना किंवा गाथ सप्तशती.''[१२]

## ३. संवाद निर्मिती

कांदबरी वाङ्मयप्रकारात संवाद निर्मितीला महत्त्वाचे स्थान दिले जाते. कारण संवाद लेखनातूनच कादंबरीतील विविध व्यक्तिरेखांच्या वृत्ती-प्रवृत्ती आपणास समजू शकतात. भाषाही

बोलणाऱ्यांच्या चारित्र्याचे आणि मन:सामर्थ्याचे प्रतीक असते. 'यथा भाषिक: तथा भाषा' या उक्तीप्रमाणे भाषा ही व्यक्तिच्या सर्वांगीण विकासासाठी आणि समाजाच्या समाजिक विकासासाठी असते. प्रदेश राज्यांच्या व घटक राज्यांच्या सर्व कारभारात त्या त्या प्रादेशिक भाषेला म्हणजेच तेथील बहुसंख्यांकांच्या मातृभाषेला स्थान असते. म्हणून बहुतांश कलाकृतीत संवाद निर्मितीही त्या त्या प्रादेशिक प्रांतानुसार व घटना-प्रसंगांनुसार होत असते.

कादंबरीत अनेक व्यक्तिरेखा असल्याने त्यांच्या संवादांचे स्वरूपही बदलत असते. काही वेळा व्यक्तिरेखांच्या मनानुसार संवाद घडत असतात, तेच आपण या कलाकृतीच्या माध्यमातून पाहणार आहोत. उदाहरणार्थ काही संवाद पहा.

"कारे ओ मध्याऽऽ...

'काय हाय रे?' मधूने पलंगावरून विचारलं.

एकनाथला पाहून त्याचे मित्र पुन्हा अंग चोरून बसले.

'कोल्डं सरपण कावून नाही फोडून घेतलं बे खंड्याकून?'

'मले काय माईत सरपणाचं. आसे बायले धंदे नस्तो करत आपून...'

'मग काय मर्दानी कामं करतू ते तरी सांग... कुठं काय तीर मारतू त...'

'चला रे ! नाई बसू देणार आपल्याले हा सुखानं..."[१३]

"अबे इधर आबे साले, बहोत मजा है !'

'थंडी हवा लगती क्या रे?'

'हां ... हां... आजा...'

'आता न बे ... चल रे च्युतके!'

'आता ना बे छिनालके..."[१४]

''काय नाव ठेवलं नाताचं?''

'कायनू माय. लय भारी नाव हाये. रुचितिलीक का काय नवाडंच नाव हाये. मले येतबी नाई. मी आपली त्याले बाबूच म्हणती.'

'चांगलं झालं माय. तुले नातू खेळवाय भेटते.'

'हाव. लय करमते लहान लेकरासंग...'

'नशीबच पाह्यजे नातवाचं तोंड पाह्याले.'

'तुमच्या मोठ्याले काईच नाई अजून. पाच-सा सालं झालं अस्तीन नं लगनाले?'

'झाले. पण नातू नाई झाला. काय सांगावं तुले करमाचे भवाडे.'

'कावून, दुपवती का काय सून?'

'दुपवती नाई. पाडू पाडू आणती. राहूच देत नाई.'

'आता माय बया. बाई हाये का कैदासीन? तरी शिकेल सवरेल हाये नं?'

'........'

'मंग लाह्यन्याचं ढूमढूम करून टाकावं. अन् आता बिनशिकेल बायको करावं. म्हन्जे पाडू पाडू आणणार नाई. दरसाली पाळणा हालत जाईन.''[१५]

''कधी आला बाबू?'' घशातून काथून काथून शब्द आले.

'नेमकाच, ह्यो टेकूनच राह्यलो आबा.'

'खुशाल हाये नं सम्दे...' विचारताना सुभानरावाला जाणवलं, आपल्या छातीत काहीतरी तडकल्यासारखं झालं आहे.

'हावं, खुशाल हायेत !'

'खुशाल हायेत?' रणरणत्या उन्हातून घामाझोकीर चालताना विहिरीत उडी मारावी तसा जीव झाला.

'हावं, खुशाल हायेत...'

'मंग रडून कावून राह्यली ही?'

'ती एकनाथमामासाठी रडा लागली.'

'कावून, त्याले काय झालं?' काळजात पुन्हा दुसरी चमक.

'ते, नवकरी नाई लागा लागली नं... म्हणून...'

'जयहरी... जयहरीऽऽ...' असं म्हणून सुभानराव चिडून उठले.''[१६]

अशा स्वरूपाचे संवाद कांदबरीत पुष्कळ ठिकाणी येतात व कादंबरीच्या कथानकाला आणि व्यक्तिरेखांच्या विकासाला मदत करतात.

## ४. काव्यात्मकता

सदानंद देशमुख यांच्या लेखनशैलीचे आणखीन एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी 'बारोमास' या कलाकृतीत आशयाला अनुसरून काव्यात्मकता आणली आहे तो अतिशय आकर्षकपणे या कलाकृतीत मांडली आहे. त्यामुळे कलाकृतीला वास्तवता लाभते व उंची प्राप्त होते. तरी आपण कादंबरीतील काव्यात्मकता पाहू. उदाहरणार्थ,

अलका एकनाथच्या वहीतील कविता वाचत असते तेव्हाच एकनाथला सुचलेली एक कविता, लेखक लिहितो,

''.... तुझ्या मेंदीभरल्या सुकुमार हाताने लिहून ठेवलेल्या कवितेच्या ओळी, मी टिपून घेतो तहानल्या ओठांनी. आणि झुलत राहतो वाऱ्यावर डहाळी झुलावी अगदी तेवढ्याच नजाकतीने.

माझ्या बंद डोळ्यांच्या खळबळजनक विश्वात कवितेतून तू, आणि तुझ्यातून कविता उगवत असते...''[१७]

तसेच, कादंबरीत लेखकाने गल्लीतील फेर धरून नाचणाऱ्या बायकांच्या गाण्याचेही चित्रण केले आहे. ते सवाल जवाबाच्या माध्यमातून, ते आपण पाहू.

''एक गट गाण्यातून दुसऱ्या गटासाठी सवाल टाकायचा.

'कोणाला लावत होती?

कोणाले पुसत होती?

कोणाच्या मुखाकडे पाहून ती हासत होती?

दुसरा गट आणखी निरगाठ मारून ठेवायचा.

एकाले लावत होती.

एकाले पुसत होती.

एकाच्या मुखाकडी पाहून ती हासत होती...

लगेच तिसरा गट कोडं उलगडणारी कलात्मक कलाटणी द्यायचा.

कुकाले लावत होती...

काजळाले पुसत होती...

आरशाच्या भिंगाकडी पाहून ती हासत होतीऽऽ...''[१८]

अशा प्रकारचे लोकसाहित्यही कादंबरीत आल्याने कादंबरीतील जीवनचित्रणही समृद्ध झाले आहे.

## ५. उपमांचा समर्पक वापर

लेखकाने कादंबरी लेखन करीत असताना, कादंबरीच्या कथानकाला उपयुक्त अशा काही उपमांचीही पेरणी भाषेत केली आहे. त्यामुळे त्यांची भाषाशैली सामर्थ्यशाली बनली आहे. तरी आपण काही उपमांचा आढावा घेऊ.

नानू आजा शेतात संकरित बियाणे पेरू देत नसतो. पण त्याचे न ऐकता सुभानराव संकरित बियाणे शेतात पेरतात तेव्हा नानू आजा भांडतो. पण सुभानरावांच्यासमोर त्याचे काही चालत नाही, तेव्हा तो ''ढेकळासारखा मुरत गेला''[१९] असे लेखक लिहितात, म्हणजेच नानू आजाला लेखकाने इथे ढेकळाची उपमा दिली आहे.

घरात कोणत्याच प्रकारचे सरपण नाही म्हणून एकनाथ बांबू मोडून सरपण म्हणून देतो, अलका त्यावर स्वयंपाक करत असते तेव्हा तिथे शेवंतामाय येते. आणि म्हणते, ''आरे रामा रामाऽऽ रामाऽऽ येळवावर सयपाक करा लागली का काय सुगरण?''[२०] इथे शेवंतामाय अलकाला सुगरण ही उपमा देते पण ते उपरोधात्मक आहे हे लक्षात येते.

मधु आपले काही मित्र घेऊन घरात बसलेला असतो तेव्हा एकनाथला वाटते, ''बैठकीतल्या पलंगावर साल्यानं कोणीतरी रताळे आणून बसवले असले पाहिजे.''[२१] या ठिकाणी एकानाथ आपल्या भावाला मधुसाठी साल्या ही शिवी दिली आहे, तर त्यांच्या मित्रांना रताळ्याची उपमा दिली आहे.

घरात डासाला कंटाळलेल्या एकनाथच्या मनात विचार येतो की, ''डासांना कान अधिक प्रिय का वाटत असावे? त्यांना कानाच्या गुहेतून मेंदूच्या डोंगरात प्रवेश करावा वाटतो की काय?''[२२] इथे लेखकाने कानाच्या छिद्रांना गुहा व मेंदूला डोंगर अशी उपमा दिलेली आहे.

लेखकाने गुलाबाच्या फुलांना ममता वारेच्या देहाची उपमा दिली आहे. ते लिहितात, ''कळ्यांचे घोस. गुलाबाच्या ताटव्यावर मुठीएवढाले मुसमुस फुलं. थेट ममता वारेच्या देहासारखे मोहतुंबी...''[२३]

आपण आणखीन काही कादंबरीतील उपमा पाहू.

''घर म्हणजे उकिरडा''[२४]

''इठ्ठलाच्या देवळात. म्हणे रडारडी चालू हाये तुमच्या दारात ... काय झालं?''[२५]

''शेंडी आणि शेपूट यांना अटकाव करणे.''[२६]

''कधी गावात येऊन डबड्यापुढे येऊन बसतो,''[२७]

''हे जनावरं लय बेकार. उपाशी पोटानं आजेबात काम करत नाई.[२८]

''थप्पीतला एक एक अर्ज काढून तो हातातल्या पेनने अर्जावर खुणा करत होता.''[२९]

''काय शेवचिवड्याच्या कागदासारखे केले हे?''[३०]

''पैशावाले ढेकूनजी पैसे देतात''[३१]

''आधी आवषिध कोणतं घेता?''[३२]

''बिअर म्हन्जे घोडीचा मूत''[३३]

''सुभानरावने एक फाटकं पोतं वर टाकलं. तेव्हा त्यांना मढं झाकून ठेवल्यासारखं वाटू लागलं.''[३४]

''तरण्याताठ्या उभ्या लिबांच्या झाडाचं''[३५]

''काळ्या खोडाच्या गाभ्यातलं पांढरं मांस उघडं पडू लागलं. कुऱ्हाडीच्या घावागणिक पांढऱ्या मांसाचे लगदे तुटून इकडे तिकडे उडू लागले.''[३६]

''आपलं डोकं पोकळ भोवळा झालं. आतला मेंदू वाळून कोळ झाला.''[३७]

"अलकाच्या गोऱ्यापान देहाच्या भुईवर बोटांची नखे म्हणजे फाळ किंवा तिफणीच्या फणाचे फारोळे...."[३८]

लेखकांने अशा प्रकारच्या अनेक उपमांचा कादंबरीत उपयोग करून भाषाशैली समृद्ध केली आहे.

## ६. वाक्यप्रचार, म्हणी यांचा वस्तुनिष्ठ उपयोग

कादंबरीच्या लेखनात घटना प्रसंगाचे औचित्य साधून लेखकाने अनेक ठिकाणी अधून मधून वाक्यप्रचार व म्हणी यांचे रोपण केलेले आहे. त्यामुळे वाचकाच्या मनावर त्याचा चांगला परिणाम होतो. आणि कथानकाच्या आशयाला महत्त्व प्राप्त होते. तरी आपण वाक्यप्रचार, म्हणी उदाहरणार्थ पाहू.

"खताने नव्हाळीचे नऊ दिवस साजरे केले."[३९]

"हातावर पाणी पल्डं की चाल्ला भाईर. आता घोर नाई रातभर..."[४०]

"दिसायले देखणी अन् कामाले पोकळ फुकणी..."[४१]

"अन् कुत्र्याच्या जातीले थोडं आवतन द्या लागते..."[४२]

"फुकटात तबला वाजवतूच्या वाजवतू. अन म्हन्तू आवाज चांगला येत नाई..."[४३]

"जगाच्या कल्याणा संताच्या इभूती"[४४]

"फुकटात बसू दे अन् दोन दम मारू दे, आसं जमते का कुठी."[४५]

"मूठभर घुगऱ्या अन् सारी रात मचमच झाली साली."[४६]

"बारा वर्स तप केलंन्, गाढवाशी पाप केलं?"[४७]

"बेंबीच्या देठापासून ओरडू लागला."[४८]

"हॅत लेका. चिरगूट चोक्या"[४९]

SARR. BALASAHEB ... LIBRARY
SHIVAJI ...

"आपलंच नाई धड, न दुसऱ्याले कशाले म्हणावं जड..."[५०]

"सहज पडे अन् दंडवत घडे!"[५१]

"सगळे शेळीचे भाऊ शेळपट"[५२]

"इकडून तिकडून वारलं अन् मंधी मुसळ मारलं."[५३]

"उठता लात बसता बुक्की करा लावावं."[५४]

"सतरा कारभारी अन् ज्यो त्यो पायखोरी."[५५]

"आयाबाया दाराशी अन् वायगोळा उराशी"[५६]

"बय गेली अन बयची वाकळबी गेली."[५७]

"तुमी तशा आमी अन् नीट बसा मामी."[५८]

"माह्या लेकीचं उभारीच्या वयात कपाळ पांढरं झाल नस्तं..."[५९]

"लंबालाट झोपलो आवंदा..."[६०]

"दुधाचा चटका लागला त ताकबी फुकून फुकून पितात लोकं."[६१]

"नाई आल्या मघा त आभाळ बघा.. अन् बरसल्या मघा त चुलीपुढी हागा..."[६२]

"धरम करा अन् चावडी चढा."[६३]

"गोळी कानाजवळून गेली आसंच म्हणावं लागन... काळ आला व्हता पण येळ आली नवती."[६४]

"अत्तराच्या फायाला म्हणावं, मागे सर!"[६५]

"जशी करणी तशी भरणी."[६६]

अशा प्रकारचे वाक्यप्रचार व म्हणी लेखकाने या कादंबरीत समाविष्ट केले आहेत.

## ७. अस्सल ग्रामीण शिव्यांचा समावेश

ग्रामीण कादंबरीत अनेक व्यक्तिरेखा एकमेकांशी संवाद साधत असतात. आणि आपले देवाण घेवाणचे कार्य साधत असतात. पण प्रसंगी या व्यक्तिरेखा आपला राग, द्वेष व्यक्त करण्यासाठी शिव्याही देत असतात. त्याचा उपयोग लेखकाने आपल्या भाषेत करून घेतला आहे. तरी आपण ते पाहू.

''गिळायला सगळे टिकोजी आहेत.''[६७]

''साल्या शिकेलबी तशाच.''[६८]

''कशाले झक मारायले पाळलं का मले?''[६९]

''सगळं बाष्कळ... तकलादू.''[७०]

''काय मस्ती आली रे बटक्यायहो येवढे.''[७१]

''लाज नाही वाटत जवळ यायला.''[७२]

''नेभळट, हलकट...''[७३]

''एवढंही बेशरम नसावं...''[७४]

''तो नालायक तर आहे ना? मध्या! साऱ्या मुलखाचा लोफर...''[७५]

''गेली वाटते धांगड पुन्हा. पल्डा वाटते कामाचा नेट तिले!''[७६]

''ते नेभळं कशाले घेता भाऊले म्हन्ल.''[७७]

''आरे च्यूतम सल्फेट.''[७८]

''अन् माणसंही तसेच गांवढळ. वेडपट....''[७९]

''आशी हिजड्याची हारणकाळजी अवलाद''[८०]

''एवढं गांडू हाये.''[८१]

"कशाले झक मारायले आला व्हता का बे चंगण्या आमच्या संग...?"[८२]

"तूबी झाला दिडा दिवसात बायकोचा भाड्या."[८३]

"हरामखोरा"[८४]

"लबाडा, झवडीच्या, हैवान हाये भडव्या."[८५]

"च्युत्या बनवते."[८६]

"गांडीत घालतू."[८७]

"अबे साले बैठने तो दे!"[८८]

"स्वार्थी, नेभळट, कृतिशून्य..."[८९]

"बाई हाये का कैदासीन?"[९०]

"बाइलबुग्या..."[९१]

"आरे कोण हाये रे हरामखोरायहो!"[९२]

"आरे चांडाळायहो. ही अवदासा कशाले आणली घरात?"[९३]

"त्या झवाडीच्याच्या नावाची चिट्ठी त लिहून जीव द्यायचा व्हता."[९४]

"याच्या मायले घोडे लावले याच्या..."[९५]

"तुझ्या मायचा धगड्या उचलील का?"[९६]

"आरे चूप बैस रे लांड्या"[९७]

"त्योच मेला हराममौतीनं...."[९८]

"याच्या मायचा पोटे याच्या ..."[९९]

अशा प्रकारांच्या शिव्यांचा वापर करून लेखकानी कादंबरीतील भाषाशैलीतून एक प्रकारचा ताजेपणा आणला आहे.

## ८. सदानंद देशमुख यांच्या लेखनाचे वेगळेपण

देशमुख अतिशय स्पष्ट आणि वास्तव पातळीवरून लेखन करतात. ग्रामीण भागातील तरुणांचे चित्रण ते 'बारोमास' या कादंबरीत करताना तरुणांची बेकारी, दारिद्रय, संघर्ष, अपयश या गोष्टींना अग्रक्रम दिला आहे. त्यामुळे कादंबरीतील कथानक ग्रामीण भागात कोठेही घडू शकते. इतके सहज लेखन लेखकाने केलेले आहे. हे लेखन करताना कादंबरीत घटना-प्रसंग, ग्रामीण भाषा, शब्दरचना, वाक्यरचना, म्हणी, वाक्यप्रचार, काव्यात्मकता या गोष्टी कृत्रिमपणे आणलेल्या नाहीत तर त्या सहज येतात आणि कादंबरीतील कथानकास उपयुक्त ठरतात.

'बारोमास' या कादंबरीचे चित्रण करत असताना, एकनाथ, अलका, नानूआजा, सुभानराव, शेवंतामाय, मधु, ममता वारे व सुरेश साठे या सारख्यांची चित्रणे देशमुख वस्तुनिष्ठ शब्दांत करतात. तर काहीवेळा कल्याणीचा मळा, मोहाडी, सांजोळ, खामगावचा परिसर साक्षात वाचकासमोर उभा करतात. तसेच वारंवार पडणारा दुष्काळ आणि दुष्काळामुळे प्राणी, पशुपक्षांची होणारी होरपळ वाचकांच्या मनाला चटका लाऊन जाते. म्हणून ही कादंबरी इतर कादंबऱ्यांपेक्षा वेगळी टरते.

## समारोप

आपण या कादंबरीतील भाषाशैलीचा अभ्यास केल्यानंतर आपणास असे निष्कर्ष काढता येतात की, 'बारोमास' या कादंबरीत निवेदनासाठी प्रमाणबोली व संवादासाठी वऱ्हाडी बोलीचा उपयोग केला आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील वाचकांना ही कादंबरी वाचत असताना जवळची वाटते. ग्रामीण जीवनातील घटना-प्रसंग हुबेहूब कादंबरीत चित्रित होताना दिसतात. म्हणून आपण या कादंबरीला ग्रामीण जीवनातील संघर्ष चित्रित करणारी आणि उत्कृष्ट भाषाशैली असणारी कादंबरी म्हणू शकतो.

LIBRARY

## संदर्भग्रंथ


| | | |
|---|---|---|
| १. | पाटील, गो.तु. | अनुष्टुभ, जानेवारी-फेब्रुवारी, २००४ |
| | | 'बारोमास': शेतकऱ्यांच्या हतबलतेची कहाणी. एकनाथ पगार. |
| २. | देशमुख, सदानंद | 'बारोमास' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयनगर, पुणे-३०, आवृत्ती पहिली २००२, पृष्ठ-११ |
| ३. | तत्रैव | पृष्ठ - ३१ |
| ४. | तत्रैव | पृष्ठ - ४६ |
| ५. | तत्रैव | पृष्ठ - ५५ |
| ६. | तत्रैव | पृष्ठ - ७५-७६ |
| ७. | तत्रैव | पृष्ठ - ३१५ |
| ८. | तत्रैव | पृष्ठ - २२ |
| ९. | तत्रैव | पृष्ठ - ४२ |
| १०. | तत्रैव | पृष्ठ - ११९ |
| ११. | तत्रैव | पृष्ठ - १६१ |
| १२. | तत्रैव | पृष्ठ - १७८ |
| १३. | तत्रैव | पृष्ठ - ६ |
| १४. | तत्रैव | पृष्ठ - १२२ |
| १५. | तत्रैव | पृष्ठ - १२९ |
| १६. | तत्रैव | पृष्ठ - १४७ |
| १७. | तत्रैव | पृष्ठ - १९ |
| १८. | तत्रैव | पृष्ठ - २६४ |
| १९. | तत्रैव | पृष्ठ - १ |
| २०. | तत्रैव | पृष्ठ - ८ |
| २१. | तत्रैव | पृष्ठ - ९ |
| २२. | तत्रैव | पृष्ठ - २१ |

२३. तत्रैव पृष्ठ - २२

२४. तत्रैव पृष्ठ - ५४

२५. तत्रैव पृष्ठ - ५७

२६. तत्रैव पृष्ठ - ६३

२७. तत्रैव पृष्ठ - ६६

२८. तत्रैव पृष्ठ - ७३

२९. तत्रैव पृष्ठ - ७५

३०. तत्रैव पृष्ठ - ७५

३१. तत्रैव पृष्ठ - ८०

३२. तत्रैव पृष्ठ - ८५

३३. तत्रैव पृष्ठ - ८५

३४. तत्रैव पृष्ठ - १६०

३५. तत्रैव पृष्ठ - १६७

३६. तत्रैव पृष्ठ - १६९

३७. तत्रैव पृष्ठ - २२०

३८. तत्रैव पृष्ठ - १४१

३९. तत्रैव पृष्ठ - १

४०. तत्रैव पृष्ठ - ९

४१. तत्रैव पृष्ठ - १६

४२. तत्रैव पृष्ठ - ३१

४३. तत्रैव पृष्ठ - ३४

४४. तत्रैव पृष्ठ - ३७

४५. तत्रैव पृष्ठ - ४३

४६. तत्रैव पृष्ठ - ५०

४७. तत्रैव पृष्ठ - ५३

४८. तत्रैव पृष्ठ - ५६

४९. तत्रैव पृष्ठ - ८४

५०. तत्रैव पृष्ठ - ९४

५१. तत्रैव पृष्ठ - १०७

५२. तत्रैव पृष्ठ - १२३

५३. तत्रैव पृष्ठ - १३०

५४. तत्रैव पृष्ठ - १३०

५५. तत्रैव पृष्ठ - १४९

५६. तत्रैव पृष्ठ - १५६

५७. तत्रैव पृष्ठ - १५९

५८. तत्रैव पृष्ठ - १७२

५९. तत्रैव पृष्ठ - २१७

६०. तत्रैव पृष्ठ - २१७

६१. तत्रैव पृष्ठ - २१९

६२. तत्रैव पृष्ठ - २६६

६३ तत्रैव पृष्ठ - २८३

६४ तत्रैव पृष्ठ - ३०९

६५ तत्रैव पृष्ठ - ३१९

६६ तत्रैव पृष्ठ - ३३२

६७ तत्रैव पृष्ठ - ६

६८ तत्रैव पृष्ठ - १३

६९ तत्रैव पृष्ठ - १७

७० तत्रैव पृष्ठ - १९

७१ तत्रैव पृष्ठ - १९

७२. तत्रैव पृष्ठ - २०

७३. तत्रैव पृष्ठ - २०

७४. तत्रैव पृष्ठ - २०

७५. तत्रैव पृष्ठ - २४

७६. तत्रैव पृष्ठ - २५

७७. तत्रैव पृष्ठ - २७

७८. तत्रैव पृष्ठ - ४०

७९. तत्रैव पृष्ठ - ४५

८०. तत्रैव पृष्ठ - ४७

८१. तत्रैव पृष्ठ - ४७

८२. तत्रैव पृष्ठ - ५०

८३. तत्रैव पृष्ठ - ५३

८४. तत्रैव पृष्ठ - ६९

८५. तत्रैव पृष्ठ - ७४

८६. तत्रैव पृष्ठ - ७९

८७. तत्रैव पृष्ठ - ८१

८८. तत्रैव पृष्ठ - ८४

८९. तत्रैव पृष्ठ - ११०

९०. तत्रैव पृष्ठ - १२९

९१. तत्रैव पृष्ठ - १४०

९२. तत्रैव पृष्ठ - १६७

९३. तत्रैव पृष्ठ - १८२

९४. तत्रैव पृष्ठ - २१५

९५. तत्रैव पृष्ठ - २७५

९६. तत्रैव पृष्ठ - २७९

९७. तत्रैव पृष्ठ - २९८

९८. तत्रैव पृष्ठ - ३२३

९९. तत्रैव पृष्ठ - ३२५